# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 18 October 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १८ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मलावीचे राष्ट्राध्यक्ष लॅझरस चकवेरा यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. तसंच दोन्ही देशांमध्ये विविध मुद्द्यांवर शिष्टमंडळ स्तरावरची चर्चादेखील होणार आहे. राष्ट्रपती मलावीमधल्या राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि स्मृतीस्थळाला भेट देणार आहेत. दरम्यान, काल संध्याकाळी राष्ट्रपती मुर्मू यांनी मलावीमधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. भारताबाहेर राहणाऱ्या आपल्या देशवासियांचं कल्याण ही आपल्या सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. भारतीयांच्या चिंता दूर करण्यासाठी आणि त्यांची सुरक्षा, कल्याण आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी आम्ही जगभरातल्या आमच्या भागीदारांसोबत काम करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. मलावीमधला भारतीय समुदाय हा दोन्ही देशांमधला दुवा असल्याचं सांगून राष्ट्रपतींनी, मलावीच्या समाज आणि अर्थव्यवस्थेत भारतीयांच्या योगदानाचं कौतुक केलं.

****

झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होत आहे. या टप्प्यात ४३ जागांसाठी येत्या १३ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. आजपासून २५ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. २८ तारखेला अर्जांची छाननी होईल, आणि ३० ऑक्टोबर ही अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. राज्यात सर्वच राजकीय आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबतच्या चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. दरम्यान, महाराष्ट्रात येत्या मंगळवारी २२ तारखेला निवडणूक अधिसूचना जारी होणार असून, त्यादिवसापासून २९ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरता येणार आहेत.

****

विधानसभा निवडणुकीसाठी लातूर शहर आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघा अंतर्गत नियुक्त करण्यात आलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि विविध पथकांचे नोडल अधिकारी यांच्या कामकाजाचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी आढावा घेतला. तसंच निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. स्थिर निगराणी पथकं आणि भरारी पथकांनी निवडणूक काळात कोणतेही गैरप्रकार घडू नयेत, यासाठी दक्ष रहावं, कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास तातडीने कार्यवाही करून, त्याबाबतचा अहवाल संबंधित नोडल अधिकार्यांना यांना सादर करावा, आदी सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

****

आगामी विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल सज्ज झालं आहे. जिल्ह्यात मद्याची आणि इतर अंमली पदार्थाची वाहतूक होऊ नये म्हणून तपासणी नाके कार्यान्वित करण्यात आले आहेत. गोवा राज्याच्या सीमेवर नऊ आणि कर्नाटक राज्याच्या सीमेवर एक, असे एकूण १० आंतरराज्य चेकपोस्ट कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यात १८ स्थायी सर्वेक्षण पथकं आणि १० भरारी पथकं नेमण्यात आली आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ७९८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार असल्याची माहिती, सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दिली.

****

सिंधुदूर्गचे माजी आमदार राजन तेली यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. आपला राजीनामा त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसंच देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला आहे.

****

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या पी व्ही सिंधूचा सामना इंडोनेशियाच्या ग्रगोरिया मारिस्का तुनजुंग हिच्याशी होणार आहे. सिंधुनं काल चीनच्या हान यू हिचा १८-२१, २१-१२, २१-१६ असा पराभव केला. इतर सर्व भारतीय खेळाडूंना पहिल्या फेरीतच पराभवाचा सामना करावा लागला.

****

नवी दिल्लीत पार पडलेल्या आय एस एस एफ जागतिक नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारतानं दोन रौप्य आणि दोन कांस्य अशा एकूण चार पदकांची कमाई केली आहे. चार पदकांसह भारत पदकतालिकेत ९ व्या क्रमांकावर राहिला.

****

आसाममधल्या तामूलपुर या छोट्या गावातल्या खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रातल्या सहा तलवारपटूंची ६८ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुढच्या महिन्यात जम्मू काश्मीरमध्ये या स्पर्धा होणार आहेत.

****

बंगळुरु इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या क्रिकेट कसोटीत आज तिसऱ्या दिवशी न्यूझीलंड संघानं आतापर्यंत ३१७ धावांची आघाडी घेतली आहे. संघानं आतापर्यंत ७ बाद ३६३ धावा केल्या. भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या ४६ धावांत संपुषटात आलं आहे.

****

महिलांच्या टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेनं अंतिम फेरीत धडक मारली आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात काल दक्षिण अफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाचा आठ गडी राखून पराभव केला. दुसरा उपांत्य सामना वेस्ट इंडिज आणि न्यूझीलंड यांच्यात आज शारजाह इथं खेळला जाणार आहे.

****

आदिलाबाद–नांदेड–आदिलाबाद इंटरसिटी एक्सप्रेस मुदखेड–नांदेड–मुदखेड दरम्यान आज अशतः रद्द करण्यात आल्याचं दक्षिण मध्य रेल्वे कार्यालयानं कळवलं आहे. ही रेल्वे अदिलाबाद इथून सकाळी आठ वाजता निघून ११ वाजून ५५ मिनिटांनी नांदेड इथं पोहाचते तसंच नांदेड इथून तीन वाजून पाच मिनिटांनी निघते.

दरम्यान, नरसापूर – नगरसोल एक्सप्रेसच्या वेळापत्रकात आजपासून करण्यात आलेला बदल रद्द करण्यात आला आहे.

****